**<u>नियमित दिवाणी दावा क्रं.३३२/२०२३</u>**
(CNR No.MHSO220048702023)

## <u>निशाणी क्रं.५६ वरील आदेश</u>

प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये दाखल केलेला आहे. प्रतिवादींचे कथन असे की, वादींनी प्रस्तुतचा दावा दाखल करुन प्रतिवादी क्र.२ ते ४ यांचे दावा मिळकतीमधील असलेले मालकी हक्क व कब्जे वहिवाटीस आव्हान दिलेले असलेले वादी प्रतिवादींचे दरम्यान असलेल्या दावा मिळकतीबाबतच्या वादाचे योग्य व न्यायिक निरसन होणे जरुरीचे आहे. सदर बाबतीत प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी कैफियत देते वेळी नजरचुकीने व अनावधानाने दावा मिळकतीमधील मालकी हक्क जाहीर होऊन मिळणेकामी व निरंतर ताकीदीकरीता प्रतिदावा करणेचे राहून गेलेले आहे. तसेच सदर बाबतीत प्रतिवादी क्र.२ ते ४ यांनी अलहिदा वेगळा दावा दाखल केलेस विनाकारण दाव्यांची संख्या वाढून गुंतागुंत निर्माण होणार आहे. त्यामुळे सदरकामी न्यायाचे हिताचे दृष्टीने प्रतिवादींना कैफियत कलम १२ मध्ये नमूद केलेप्रमाणे दुरुस्ती करणेस व प्रतिदावा दाखल करणेस परवानगी मिळणेची विनंती केली.

२. वादी यांनी प्रस्तुत अर्जास निशाणी ५८ अन्वये म्हणणे देवून कथन केले की, प्रतिवादींचा सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मधील कायदेशीर तरतुदींमध्ये मुळीच बसत नाही. प्रस्तुत अर्जामध्ये नमूद केलेली प्रस्तावित दुरुस्ती ही प्रस्तुत दाव्यामधील वादी– प्रतिवादींच्या दरम्यान असलेला मुख्य विवादीत विषय सोडविण्यासाठी मुळीच उपयुक्त ठरणार नाही. दाव्याचे पुराव्याचे कामकाज सुरु झाल्यानंतर दुरुस्तीचा अर्ज मुळीच मंजूर करता येणार नाही. सदर प्रकरणी कैफियत देते वेळी केवळ नजरचुकीने व अनावधानाने प्रतिदावा करणेचे राहून गेले आहे अशा आशयाचा सदर अर्जातील मजकूर व दिलेले कारण हे प्रस्तुत प्रकरणी कैफियत दुरुस्ती करुन प्रतिदावा दाखल करणेकामी मुळीच पुरेसे व उपयुक्त ठरणार नाही किंवा स्वीकारता येणार नाही. सबब सदरचा अर्ज रद्द होण्यास पात्र आहे.

३. प्रतिवादींनी दाखल केलेल्या सदरच्या दुरुस्ती अर्जामधील प्रस्तावित प्रतिदावा हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम ६(अ) मधील कायदेशीर तरतुदींमध्ये मुळीच बसत नाही. वास्तविक पाहता यातील प्रतिवादी यांना प्रस्तुतचा प्रतिदावा यातील वादी विरुध्द दाखल करणेसाठी कधीही कोणतेही, कसलेही कारण घडलेले नव्हते व नाही. मुळ दाव्यातील प्रतिवादी क्र.२ ते ४ यांना प्रतिदावा करण्यास कारण घडले आहे असे निदर्शनास आले तरी नमूद दोन्ही तथाकथित कारणे (Cause of action) हे दिनांक १८.१०.२०२० व ०९.१२.२०२० रोजीचे असल्यामुळे एवढया मोठया प्रदिर्घ विलंबाचे कालावधीनंतर अशा प्रकारे कैफियत दुरुस्त करुन सदर प्रकरणी प्रतिदावा हा मुळीच दाखल करता येणार नाही. सबब सदरचा अर्ज हा रद्द होण्यास पात्र आहे.

४. प्रतिवादींचे विधिज्ञ श्री.आर.बी. राऊत यांनी त्यांचे कथना पुष्टयर्थ मा.उच्च व सर्वोच्च न्यायालय यांचे पुढील न्यायनिर्णय दाखल केले आहेत.

1. Maruti Vithoba Kulal and Ors. Vs. Nivrutti Deoram Kulal and Ors. 2019(2) ALL MR 723

2. Ashok Kumar Kalra Vs. Surendra Agnihotri and Ors. (Manu/SC/1590/2019)

वादीचे विधिज्ञ श्री.जे.डी.देवकर यांनी त्यांचे कथना पुष्टयर्थ मा.उच्च व सर्वोच्च न्यायालय यांचे पुढील न्यायनिर्णय दाखल केले आहेत.

1. Ashok Kumar Kalra Vs. Surendra Agnihotri and Ors. (Manu/SC/1590/2019)

2. Ajit Narsinha Talekar Vs. Smt. Nirmala Wamanrao Kekade & Ors. (W.P.N.10922/09)

3. Vijay Prakash Jarath Vs. Tej Prakash Jarath (C.A.No.2308-2309 of 2016)

५. अर्ज, अर्जावरील म्हणणे तसेच अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही पक्षातर्फे दाखल मा .सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयांचे न्यायनिर्णयातील न्यायतत्वांचे अवलोकन केले.

६. वादीने दावा मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिवादींनी हरकत अडथळा करु अशा स्वरुपाचा निरंतर ताकीद मनाई हुकूमाची मागणी दाव्यात केली आहे. वादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादींनी दिनांक ३०.१०.२०२० रोजी तसेच दि.२९.११.२०२० रोजी वादीचे दावा मिळकतीतील कब्जे वहिवाटीस हरकत अडथळा केला. प्रतिवादींनी कैफियत निशाणी २१ वर दाखल करुन दावा मिळकतीत प्रतिवादींचा कब्जा असल्याचे कथन केले. प्रतिवादींच्या कथनानुसार दावा मिळकतीवर त्यांचा कब्जा आहे. वादीने दिनांक ०९.१२.२०२० रोजी प्रतिवादींना दावा मिळकतीमध्ये अनाधिकृत ताबा घेण्याचा प्रयत्न केला असे कथन आहे. सदर बाब प्रतिवादींनी कैफियतीमध्ये नजरचुकीने नमूद केली नाही. त्यामुळे प्रतिवादींनी प्रस्तुत दाव्यात सुचित दुरुस्ती त्याचप्रमाणे प्रतिदावा दाखल करण्याची परवानगी मागितली आहे.

७. प्रस्तुतचा दावा वादीने सन २०२० मध्ये दाखल केला तसेच प्रतिवादींनी प्रस्तुत दाव्यास कैफियत दि.०१.०१.२०२१ रोजी दाखल केली आहे. न्यायालयाने प्रसतुत दाव्यामध्ये दि.२७.०१.२०२१ रोजी मुददे काढलेले आहेत. वादीने प्रस्तुत दाव्यामध्ये पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असून दावा प्रतिवादीच्या उलटतपासाकरीता प्रलंबित आहे. दावा मिळकत तसेच प्रतिदाव्यामध्ये नमूद मिळकतीचा विषय तसेच पक्षकार एकच आहे. दोन्ही पक्षांचे म्हणणे दावा मिळकतीवर त्यांचा ताबा असल्याचे आहे. त्यामुळे वादीने प्रतिवादीच्या विरुध्द निरंतर ताकीद मनाई हुकूमाचा दावा दाखल केला आहे. प्रतिवादीने देखील प्रतिदावा हा त्याच मिळकतीबाबत दाखल करण्याची परवानगी मागितली आहे. तसेच प्रतिवादींचा दावा मिळकतीवर ताबा असल्याचे कथन असलेने वादींच्या विरोधात प्रतिदाव्यात निरंतर ताकीद मनाई हुकूमाची प्रतिवादींची मागणी आहे. दाव्याचे पुराव्याचे कामकाज सुरु झाले असताना प्रतिवादींनी कैफियतीत सुचित दुरुस्ती तसेच प्रतिदावा दाखल केलेला आहे. झालेला उशीर हा कायद्यातर्गंत नाही. परंतु सुचित दुरुस्ती तसेच प्रतिदाव्यामुळे वादीच्या कथनास कोणतीही बाधा येत नाही. केवळ दाव्यास तसेच सुचित प्रतिदाव्यास घडलेले कारण हे वेगळया दिवशी दर्शविले असल्याचे निदर्शनास येते. एकाच मिळकतीकरीता वेगवेगळे दावे होणे कायद्यातर्गंत ठरत नाही. तसेच दोन्ही पक्षांच्या हितावह देखील ठरत नाही. प्रतिवादीने दाव्यात सुचविलेली

दुरुस्ती ही दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ च्या अतर्गंत असून कायदेशीर असल्याचे निदर्शनास येते. त्याचप्रमाणे प्रतिवादींनी दुरुस्ती अर्जासमवेत प्रतिदावा दाखल करण्याची मागणी ही दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ८ नियम ६अ च्या अतर्गंत येत असल्याचे निदर्शनास येते. प्रतिवादी तर्फे दाखल मा.सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयातील न्यायतत्वे प्रतिवादीच्या कथनास मिळती जुळती असल्याने प्रतिवादीस उपयुक्त ठरतात. याउलट वादीतर्फे दाखल मा.सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयातील न्यायतत्वे वादीच्या कथनास मिळती जुळती नसल्याने वादीस उपयुक्त ठरत नाहीत. केवळ प्रतिवादींकडून दाव्यात दुरुस्ती तसेच प्रतिदावा करण्यास केलेला अर्ज हा विलंबाने करण्यात आला. तसेच विलंबाचे कारण संयुक्तीक नमूद केले नाही. या कारणामुळे प्रतिवादीचा अर्ज रद्द करणे न्यायोचित्त ठरत नाही. सदरचा अर्ज मंजूर झाल्याने वादीच्या कथनास कोणतीही बाधा पोहचत नाही. तसेच एकाच मिळकतीकरीता अनेक दावे दाखल होणे न्यायोचित ठरत नाही. प्रतिवादीने प्रस्तुतचा अर्ज उशिरा दाखल केल्याने दंडासह अर्ज मंजूर करणे न्यायोचित्त ठरते. करीता पुढील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. प्रतिवादीचा अर्ज दंड रक्कम रुपये २,०००/– सह मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादींनी कैफियतीमध्ये सुचवलेली दुरुस्ती विहीत मुदतीमध्ये व प्रतिदावा विहीत मुदतीमध्ये दाखल करावा. तसेच दुरुस्त कैफियतीची व प्रतिदाव्याची प्रत विहीत मुदतीत दाखल करावी.

३. दंडाची रक्कम रुपये २,०००/– वादींना आजच देण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

४. अर्जदाराने विहित मुदतीत पूर्तता न केल्यास अर्ज आपोआप नस्तीबंद समजण्यात येईल.

Sd/–

स्थळ - करमाळा.
दिनांक - २५.०१.२०२४

( मीना प्र. एखे )
दिवाणी न्यायाधीश व.स्तर, करमाळा

**CERTIFICATE**

I affirm that, the contents of the this P.D.F file Order/Judgment are same word to word, as per the original order/ judgment

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | B.R.Kondekar |
| Court Name | : | Civil Court Senior Division, Karmala |
| Date | : | 25.01.2024 |
| Order/Judgment signed by the Presiding Officer on | : | 25.01.2024 |
| Order uploaded on | : | 25.01.2024 |